पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोकअहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स),
संकेतस्थळ: www.sus.ac.in ई-मेल: purchaseu२०१९@sus.ac.in

जा.क्र.पुअहोसोविसो/विवले/खभांवि/२०२५/117

दिनांक: 20 MAY 2025

## परिपत्रक

विद्यापीठातील सर्व संकुले/प्रशासकीय विभाग व संबंधितांना कळविण्यात येते की, आपल्या विभागाकडे असणाऱ्या विविध प्रिंटरच्या टॉनर रिफिलींगसाठी व टोनर दुरुस्तीच्या कामासाठी न्युनतम दर असलेली फर्म मे.आय.टी. एक्सपर्ट, सोलापूर यांच्याशी मा.कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने एक वर्षाच्या कालावधीसाठी (दि.१९/०५/२०२५ ते १८/०५/२०२६) वार्षिक दर करार करण्यात आलेला आहे. टोनर रिफिलींग व टोनर दुरुस्तीच्या कामासाठी मंजूर दर खालील प्रमाणे आहेत.

| Sr. No. | Name of the Article | Quantity | Total Rate With GST |
|---|---|---|---|
| 01. | Canon 2900 Toner Refilling | 120 gm. | ₹.132/- |
| 02. | HP LaserJet 1020 Toner Refilling | 120 gm. | ₹.132/- |
| 03. | HP LaserJet 1005 Toner Refilling | 80 gm. | ₹.132/- |
| 04. | Samsung ML 1640 Series | 80 gm. | ₹.100/- |
| 05. | Canon MF 244 dw | 80 gm. | ₹.115/- |
| 06. | Brother MFC-B7715 dw | 120 gm. | ₹.110/- |
| 07. | Blade Replacement | 01 Qty | ₹.25/- |
| 08. | Drum Replacement | 01 Qty | ₹.68/- |
| 09. | PCR Replacement | 01 Qty | ₹.42/- |
| 10. | Magnetic Rod Replacement | 01 Qty | ₹.56/- |

सर्व संकुल व प्रशासकीय विभाग प्रमुखांना आदेशान्वये सुचित करण्यात येते की, उपरोक्त टोनर रिफिलींग व टोनर दुरुस्ती करण्यापूर्वी संबंधित समान लेखा संहितानुसार सक्षम प्राधिकाऱ्यांची प्रशासकीय मान्यता घेवून सदर फर्मला करारातील अटी व शर्तीच्या अधिन राहून पुरवठा आदेश द्यावा. व काम पूर्ण करुन घ्यावे. तसेच फर्मने टोनर रिफिलींग व टोनर दुरुस्तीचे काम समाधानकारक पूर्ण केल्यानंतर प्राप्त देयकास Accession & Allotment करुन व सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून तीन दिवसांत देयक आदायगीसाठी या विभागाकडे सादर करावे जेणे करुन सदर फर्मला देयकाची रक्कम वेळेत आदा करणे सोईचे होईल. दर कराराव्यतिरिक्त इतर फर्मकडून उपरोक्त काम केल्यास देयके पारीत करण्यात येणार नाहीत.

msidwe

**(सीए. एम.एस. खराडे)**
**वित्त व लेखा अधिकारी**

**पत्ता: -**
**मे. आय.टी. एक्सपर्ट, सोलापूर.-**
शॉप नं.०३, दत्त चौक, नवी पेठ
**सोलापूर. ४१३ ००७**
**मो. नं. ८४४६५१२६६७**

---

**प्रति,**

१. सर्व प्रशासकीय विभाग
२. सर्व संकुले
३. मा. कुलगुरु कार्यालय
४. मा. कुलसचिव यांचे कार्यालय
५. वित्त व लेखा विभाग परिपत्रक नस्ती

**सोबत: दर कराराची प्रत**

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ● 2024 ● 42AB 087735

सोलापूर अ. क्र. 3360 दिनांक 08/4/2024

श्री / सौ. / श्रीमती आय.टी. एक्सपर्ट

यांनी जनरल मुद्रांक रु. च्या

मागितलेवरून हा रू. 100/- चे मुद्रांक दिले.

भरतीस रु

प्रशांत चन्नप्पा बोध्दुल

स्टॅम्प व्हेंडर/परवाना नं. १४५/२०२४ कोषागर क्र. १७६

शहर मुद्रांक विक्रेता, सोलापूर.

कोषागार कार्यालय सोलापूर

28 APR 2025

मुद्रांक प्रमुख लिपीक / उपलेखापाल

करारनामा

(१ वर्षाकरीता)

लिहून घेणार:- कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

यांसी

लिहून देणार: मे. आय.टी. एक्सपर्ट, शॉप न.३, दत्त चौक, नवी पेठ, सोलापूर

लिहून देणार मे. आय.टी. एक्सपर्ट, सोलापूर यांनी लिहून घेणार यांना टोनर रिफिलींग/टोनर दुरुस्तीची सेवा पुरविण्याबाबतचा वार्षिक दर करारनामा खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

अटी व शर्ती:

१. **सदर वार्षिक दर कराराचा कालावधी दि.१९/०५/२०२५ ते १८/०५/२०२६ असा एक वर्षाकरिता राहील.**

२. लिहून देणार यांनी प्रिंटरचे टोनर रिफिलींग व टोनर दुरुस्ती दर मान्य केल्याप्रमाणे आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| Sr. No. | Name of the Article | Quantity | Rate Per Qty with GST |
|---|---|---|---|
| 01 | Canon 2900 Toner Refilling | 120 gm. | ₹.132/- |
| 02 | HP LaserJet 1020 Toner Refilling | 120 gm. | ₹.132/- |
| 03 | HP LaserJet 1005 Toner Refilling | 80 gm. | ₹.132/- |
| 04 | Samsung ML 1640 Series | 80 gm. | ₹.100/- |
| 05 | Canon MF 244 dw | 80 gm. | ₹.115/- |
| 06 | Brother MFC B7551 DW | 120 gm | ₹.115/- |
| 07 | Blade Replacement | 01 Qty | ₹.25/- |
| 08 | Drum Replacement | 01 Qty | ₹.68/- |
| 09 | PCR Replacement | 01 Qty | ₹.42/- |
| 10 | Magnetic Rod Replacement | 01 Qty | ₹.56/- |

३. विद्यापीठातील विविध विभागाकडून टोनर रिफिलींग/दुरुस्तीसाठी कळविल्यापासून जास्तीत जास्त सात दिवसामध्ये कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत विद्यापीठात येऊन प्रत्यक्ष जागेवर टोनर रिफिलींग/दुरुस्ती करुन द्यावी. अन्यथा प्रति दिवस रु.१००/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

४. लिहून देणार यांनी सादर केलेले देयक ७ दिवसात तपासणी करुन देयकाची रक्कम आदा करताना त्या मधून नियमानुसार सर्व करांची कपात करण्यात येईल.

५. पुरवठाधारकांना पुरवठा आदेश मिळाल्यापासून सात दिवसाच्या आत टोनर रिफिलिंग/दुरुस्ती न केल्यास पुन्हा तीन दिवसाच्या मुदतवाढीने पुरवठा आदेश देण्यात येईल. मुदतवाढीने दिलेल्या पुरवठा आदेशाच्या कालावधीमध्ये टोनर रिफिलिंग/दुरुस्ती न केल्यास अथवा काम समाधानकारक न झाल्यास आपल्या सोबत केलेला दरकरार रद्द करुन आपली सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्याबाबतच्या कार्यवाहीकरिता मा.कुलगुरु यांचेकडे सादर करण्यात येईल. त्यावर मा.कुलगुरु यांचे आदेशान्वये पुढील कार्यवाही करण्यात येईल.

६. टोनर रिफिलींग/दुरुस्तीसाठी देयक मंजूर दराप्रमाणे आदा करण्यात येईल व सदर दर कालावधीत कोणत्याही कारणास्तव दरवाढ मिळणार नाही.

७. उपरोक्त दरकरारातील टोनर रिफिलींग/दुरुस्ती व्यतिरिक्त इतर दुरुस्ती असल्यास त्याच्या खर्चाबाबत लिहून देणाऱ्यांनी संबंधित विभागास् वर नमूद प्रमाणे लेखी कळवावे अथवा त्याचे अंदाजपत्रक द्यावे.

८. टोनर रिफिलींग/दुरुस्ती करावयाची असल्यास त्याच्या मंजूर दरापेक्षा जास्त खर्च होत असल्यास येणाऱ्या खर्चाबाबत लिहून देणाऱ्यांनी संबंधित विभागास लेखी कळवावे/दरपत्रक द्यावे.

९. सदर वार्षिक दर करारांतर्गत सुरक्षा ठेव म्हणून रक्कम रुपये १०,०००/- इतकी रक्कम आपणांस भरावी लागेल. त्यानंतरच कार्यारंभ आदेश देण्यात येईल. सदरची सुरक्षा ठेव रक्कम करारनाम्यातील कालावधी समाधानकारक पूर्ण झाल्यानंतर परत देण्याचे आहे. त्यावर कोणतेही व्याज मिळणार नाही. त्याचप्रमाणे लिहून देणार यांनी प्रस्तुत मक्त्याचा पोटमक्ता देण्याचे नाही. तसे आढळल्यास प्रस्तुतचा करारनामा रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठास आहेत.

१०. मक्तेदाराने दरपत्रके सादर करताना ज्या कंपनीचे टोनर, शाई, ब्लेड, ड्रम व इतर साहित्य संबंधी माहिती व दर नमूद केलेले आहे. त्या प्रमाणेच पुरवठा करण्याचे आहे. टोनर रिफिलिंगच्या शाईचा दर्जा व प्रमाण योग्य वापरुनच रिफिलिंग करावयाचे आहे. दर्जा अथवा प्रमाण कमी वापरल्यास व तसे लक्षात आल्यास आपणावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. सदर टोनर रिफिलिंग/दुरुस्ती स्व:खर्चाने पुरवठा करुन द्यावी लागेल.

११. टोनर रिफिलींग/दुरुस्ती केल्यानंतर काही दोष निर्माण झाल्यास त्याचे देयक आदा केले जाणार नाही.

१२. टोनर रिफिलींग/दुरुस्ती करताना लिहून देणार यांचेकडून प्रिंटर / त्यातील पार्टस् चे नुकसान झाल्यास त्याची भरपाई लिहून देणार यांनी करावयाची आहे.

१३. सदर करार मुदतीत कोणत्याही प्रकारे वाद उपस्थित झाल्यास प्रथम मा.कुलगुरु महोदय यांच्याकडे व वाद न मिटल्यास ते Arbitration and Conciliation सोलापूर येथेच सोडविण्याचे राहील.

१४. वरील प्रमाणे अटी व शर्तीचा भंग लिहून देणार यांनी केल्यास सदरचा करार कोणतीही पूर्व कल्पना न देता रद्द करण्याचे व आवश्यक वाटल्यास सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्याचे अधिकार विद्यापीठास आहेत.

१५. मुदतीत व नमूद कालावधीत टोनर रिफिलींग/दुरुस्ती न केल्यास व इतर फर्मकडून सदर टोनरची रिफिलींग/दुरुस्ती करुन घ्यावी लागल्यास त्याबाबतचा खर्च लिहून देणार यांचेकडून वसूल करुन घेण्याचे अधिकार विद्यापीठास आहेत.

१६. दुरुस्ती वेळेत न केल्यास पुरवठादाराचा ठेका/दरकरार रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील व आवश्यक असल्यास पुरवठादाराची अनामत रक्कम जप्त केली जाईल.

१७. दरकराराची मुदत वाढ किंवा कमी करण्याचे अधिकार मा. कुलगुरु यांना राहतील. त्यानुसार मा.कुलगुरू यांची मान्यता घेवुन मुदतवाढ/कमी केल्याचे फर्मला तसे लेखी स्वरूपात कळविण्यात येईल.

१८. प्रस्तुत विद्यापीठातील विविध संकुले व प्रशासकीय विभाग यांच्याकडे असणाऱ्या विविध प्रिंटरच्या टोनर रिफिलिंग व टोनर दुरुस्तीसाठी मागविण्यात आलेल्या दरपत्रकातील सुचना व अटी प्रस्तुत करारनामाचा भाग असून, त्याचे पालन करणे लिहून देणार यांच्यावर बंधनकारक राहील.

१९. प्रस्तुत करारनामा सोलापूर न्यायकक्षेच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

२०. वरील अटी व शर्ती मला/ आम्हाला मान्य आहेत व माझ्या/ आम्हा वर बंधनकारक आहेत.

२१. उपरोक्त दरकरार आज रोजी दि.१९/०५/२०२५ करण्यात आला.

लिहून देणार
मे. आय.टी. एक्सपर्ट, सोलापूर

साक्षीदार:-

१. राजकुमार सके

२. लोखंडे हनुमंत सि.

19/05

लिहून घेणार
कुलसचिव
पु.अ.हो.सोलापूर विद्यापीठ, सोलापूर